स्थापना
१ मे १९५७

कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११०३७
D:\२०२६-२७\भांडारस्लेटर.docx.१०
www.apmcpune.in / Email: admin@apmcpune.in, kubspune37@rediffmail.com

जा.क्र. प्रशा/भांडार/बा.म.सं.सा/प्र.प/१८०५ /२०२६-२७ दि. :- ३०/१०/२०२६.

प्रसिध्दी पत्रक

विषय :- बायोमेट्रिक मशीन व संलग्न साहित्य पुरवठा करून कार्यान्वित करून देणेकामी दरपत्रके सादर करणेबाबत.

वरील विषयास अनुसरून सर्व पुरवठाधारक / ठेकेदार यांना कळविणेत येते की, कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेस नामवंत कंपनीचे व उत्तम दर्जाचे १) बायोमेट्रिक मशीन - ६ नग, २) बायोमेट्रिक मशीन प्रोटेक्शन बॉक्स - ६ नग, ३) नेटवर्क केबल (CAT ६ Cable) - ६० मीटर, ४) ५ पोर्ट नेटवर्क स्विच / राऊटर - ६ नग, ५) युपीएस - ६ नग, ६) वॉल माउंटिंग क्लॅम्प्स आणि स्क्रु - ६ संच इ. साहित्य खरेदी करून यंत्रणा कार्यान्वित करून देणेकामी दरपत्रके मागवित आहोत.

सदर साहित्याचा पुरवठा करणेकामी खालील नियम व अटींचे अधीन राहून आपले कमीत कमी दराचे दरपत्रक सिलबंद पाकीटामध्ये दि. ६/११/२०२६ अखेर दु. १.०० वाजेपावेतो संस्थेच्या भांडार शाखेत पोहोच करावे.

१. दरपत्रकामध्ये फर्मचा जी.एस.टी. क्रमांक, पत्ता, दुरध्वनी क्रमांक नमूद करावा.
२. दरपत्रकामध्ये मूळ दर अधिक जी.एस.टी. दर याप्रमाणे दर नमूद करावेत तसेच दरपत्रकामध्ये कामाचा एच.एस.एन. कोड नमूद करावा.
३. मुदतीनंतर दरपत्रक स्विकारले जाणार नाही.
४. दरपत्रक उघडतेवेळी संबंधित पुरवठाधारक / ठेकेदार अथवा त्यांचे प्रतिनिधीने बाजार समितीचे मुख्य कार्यालयात वेळेत हजर रहावे.
५. कोणतेही दरपत्रक अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क कृषी उत्पन्न बाजार समितीने राखून ठेवला आहे.
६. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. ६/११/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता संस्थेच्या मुख्य कार्यालयात मा. उपसचिव यांचे दालनात दरपत्रके सीलबंद असलेची खात्री करून उघडणेत येतील. दरपत्रके उघडणेचे वेळेत बदल झाल्यास ठेकेदारांना दुरध्वनीव्दारे कळविणेत येईल याची नोंद घ्यावी.
७. नियम व अटी मान्य असणाऱ्या ठेकेदारांनीच दरपत्रके सादर करावीत.

सचिव
कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

फोन : +९१ २० २४२६०२०३/२४२६२३४९/२४२७२८८७